नियमीत फौ. ख. क्र. ३१/२०१७
सरकार -वि.- देविदास
नि.क्र. ५७.

<u>**पुढील सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**</u>

१. जप्त केलेल्या वस्तु मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला जप्त केलेले पाच सुरे दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यास **आर्टिकल 'ए' ते 'ई'** देण्यात येते. आता मला चार लोखंडी सत्तु दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यास **आर्टिकल 'एफ' ते 'आय'** देण्यात येते. आता मला चार लोखंडी काणस दाखविण्यात आले ते तेच आहेत. त्यास **आर्टिकल 'जे' ते 'एम'** देण्यात येते. आता मला एक पेचकस दाखविण्यात आला. ते तेच आहे. त्यास **आर्टिकल 'एन'** देण्यात येते. आता मला जप्त केलेले तारचा गुच्छा दाखविण्यात आला. तो तोच आहे. **आर्टिकल 'ओ'** देण्यात येते. आता मला जप्त केलेल्या दोन कुऱ्हाडी दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहे. त्या **आर्टिकल 'पी' व 'क्यु'** देण्यात येते. आता मला जप्त केलेल्या दोन प्लॅस्टीकचे बॉटल दाखविण्यात आले त्यामध्ये लोखंडी छर्रे आहेत. त्या त्याच आहेत. त्यास **आर्टिकल 'आर' ते 'एस'** देण्यात येते. आता मला प्लॅस्टीकच्या दोन बॉटल दाखविण्यात आल्या त्यामध्ये बारुद पावडर आहे. ते माझ्या समक्ष जप्त केले होते. त्यास **आर्टिकल 'टी' ते 'यु'** देण्यात येते. आता मला प्लॅस्टीकची एक छोटी बॉटल दाखविण्यात आली त्यामध्ये कापूस आहे. त्यास **आर्टिकल 'व्ही'** देण्यात येते. आता मला जप्त केलेली टॉर्च दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **आर्टिकल 'डब्ल्यू'** देण्यात येते. आता मला जप्त केलेली एक लहाण प्लॅस्टीकची बॉटल दाखविण्यात आली. त्यामध्ये एक बॅटरीचा लाईट आहे. त्यास **आर्टिकल 'एक्स'** देण्यात येते. आता मला जप्त केलेली एक प्लॅस्टीकची पाण्याची बॉटल दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **आर्टिकल 'वाय'** देण्यात येते. आता मला जप्त केलेला एक रबरी ट्युबचा तुकडा दाखविण्यात आला. त्यास **आर्टिकल 'झेड'** देण्यात येते. आता मला जप्त केलेली लोखंडी मोठी काणस दाखविण्यात आली ती तीच आहे. **आर्टिकल 'एए'** देण्यात येते. आता मला जप्त केलेल्या मोटार सायकलच्या फोटो दाखविण्यात आले. त्या त्याच जप्त केलेल्या मोटार सायकलचे फोटो आहेत. त्यास **आर्टिकल 'एबी' ते 'एडी'** देण्यात येते. आता मला जप्त केलेली पांढऱ्या रंगाची प्लॅस्टीकची गोणी दाखविण्यात आली. ती तीच

आहे. त्यास **आर्टिकल 'एई'** देण्यात येते. ज्या व्यक्तींकडून मुद्देमाल जप्त केला होता, त्यांना मी बरेच वर्षे झाले असल्यामुळे त्यांना ओळखू शकत नाही.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री खानोरकर यांचे मार्फत</u>**

२. मी वन मजुर म्हणून बत्तीस वर्षांपासून काम करत होतो. माझ्या ड्यूटीची वेळ सकाळी ८.०० ते सायं. ६.०० वाजतापर्यंत होती. मी घटनेच्यावेळेस उमरेड येथे राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, उमरेड व घटनास्थळावरील अंतर बरेच लांब आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर रात्री येणे जाणेकरिता उमरेडवरुन साधन नाही. आर्टिकल 'ए' ते आर्टिकल 'एई' पर्यंत जप्त केलेल्या सर्व वस्तू घटनास्थळावर जप्त केल्या होत्या. त्या वस्तू सकाळी ५.३० ते ६.०० च्या दरम्यान जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी खोडणकर साहेब, खवडी साहेब व इतर दोन अधिकारी होते. त्यावेळी केवळ एक कागद लिहीण्यात आला होता. त्यावेळी नि.क्र.५८ वरील मोक्का पंचनामा लिहीण्यात आला होता. हे मी पाहिले नव्हते की, जप्त केलेल्या सुरे, सत्तु, कुऱ्हाड व इतर अवजारांवर रक्ताचे डाग होते किंवा नाही. मी जप्त केलेले हत्यार व अवजारे दुरुन पाहिले होते मी त्यांना हात लावून पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या वस्तू कोणाकडून जप्त केल्या होत्या ते मी सांगू शकत नाही. हे मला माहीत नाही की, नि.क्र.५८ ते ६० वरील पंचनाम्यावर कोणाकडून जप्त केल्या होत्या त्यांचे नाव नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या वस्तुंवर त्या कोणाकडून जप्त केल्या व कोणी जप्ती केल्या या संदर्भात हत्यारांवर काहीही लेबल लावलेले नाही. जप्त केलेले सामान घटनास्थळावरुन जप्त केल्यानंतर उमरेड येथे आणण्यात आले व उमरेड येथे जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. जप्त केलेले सामान हे खोडणकर साहेब व खवडी साहेब यांच्याकडे होते. हे म्हणणे खरे नाही की, खोडणकर साहेब व खवडी साहेब यांनी त्यांच्या मनाप्रमाणे पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, मी जप्त केलेले अवजारे पुन्हा ऑफीसमध्ये पाहिले होते. मी जप्त केलेले हत्यारे ऑफीसमध्ये पाहिल्यानंतर त्यावर रक्ताचे डाग मला दिसले होते. हे मला माहीत नाही की, रक्ताचे डाग दिसल्यासंदर्भात पंचनाम्यात नमुद केलेले आहे किंवा नाही. माझ्या कार्यालयाती अधिकाऱ्यांनी बंदूक जप्त केली नव्हती. पंचनामा करतेवेळी वन विभागाचे कर्मचारी व तीन ते चार आरोपी होते. आर्टिकल 'एबी' ते

'एडी' वरील फोटो उमरेडच्या कार्यालयात काढले होते. मला जप्त केलेल्या मोटार सायकलचे रंग सांगता येणार नाही. मला केवळ येवढेच माहिती आहे की, दोन मोटार सायकल होत्या. छर्रे सापडले होते म्हणून बंदूक कुठे आहे याबाबत विचारणा केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी वन विभागात काम करीत असल्यामुळे मी पंचनामावर न वाचता सही केली.हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५८ ते ६० वरील कागदपत्रांवर उमरेड व पांजरेपार येथील वन कर्मचाऱ्यां व्यतिरिक्त इतर कोणाच्या सह्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी वन विभागात काम करीत असल्यामुळे पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष काय घडले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वन विभागात काम करीत होतो त्यामुळे खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

सरकारी अभियोक्ता श्री. मोरे यांनी जप्त केलेल्या मोटार सायकलच्या संदर्भात उलटतपासात आलेल्या प्रश्नासंदर्भात साक्षीदाराची फेरतपासणी घेण्याची परवानगी मागीतली. त्यांनी त्यामध्ये जप्त केलेल्या मोटार सायकलचे कंपनी व रंग संदर्भात प्रश्न विचारण्याकरिता फेरतपासणी घेण्याची विनंती केली. त्यावर आरोपी तर्फे वकील श्री. खानोरकर यांनी अशी हरकत घेतली की, सदर प्रश्नाबाबत साक्षीदाराने उत्तर दिलेले आहे व साक्षीदाराच्या सरतपासणीमध्ये मोटार सायकलच्या कंपनी व रंगाबाबत कोणताही उल्लेख न आल्यामुळे त्याबाबत परवानगी देता येत नाही. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर व साक्षीदाराची सरतपास व उलटतपास याचे अवलोकन केल्यानंतर साक्षीदाराने मोटार सायकल संदर्भात त्याच्या सरतपासणीमध्ये रंगाबाबत काहीही कथन केलेले नाही. तसेच उलटतपासणीमध्ये त्याने कोणत्या रंगाची मोटार सायकल होती हे सांगू शकत नसल्याचे कथन केल्यामुळे त्या संदर्भात आता पुन्हा त्याच मुद्यावर साक्षीदाराची फेरतपासणी घेता येणार नाही त्यामुळे सरकारी अभियोक्ता यांची मागणी नामंजुर करण्यात येते.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक २१.०२.२०२५.

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.